15 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# प्रत्येक उपक्रमात विद्यापीठ अग्रभागी

## पी. शिवशंकर : आर. ओ. जलशुद्धीकरण व बॉटलिंग प्रकल्पाचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोणतीही शासकीय योजना किंवा उपक्रम असो त्याच्या उत्कृष्ट अंमलबजावणीत शिवाजी विद्यापीठ नेहमीअग्रभागीअसते,असेकौतुगोद्गार कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त पी. शिवशंकर यांनी शुक्रवारी काढले. शिवाजी विद्यापीठाने उभारलेल्या रिव्हर्स ऑस्मॉसिस (आर.ओ.) पद्धतीच्या जलशुद्धीकरण व बॉटलिंग प्रकल्पाचे उद्घाटन आज सकाळी आयुक्त शिवशंकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, आर. ओ. जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यामागे एक महत्त्वाचे कारण आहे. ते म्हणजे पाण्यावर सर्वांचा समान हक्क आहे आणि सर्वांना एकसारखेच शुद्ध पाणी मिळायला हवे, अशी भूमिका त्यामागे आहे. विद्यापीठाच्या कुलगुरूंपासून ते कर्मचाऱ्यापर्यंत आणि विद्यार्थ्यांना अशा सर्वांनाच समान आणि चांगल्या दर्जाचे पाणी मिळावे, यासाठी हा प्रकल्प उभारला आहे.



**कोल्हापूर : रिव्हर्स ऑस्मॉसिस (आर.ओ.) पद्धतीच्या जलशुद्धीकरण व बॉटलिंग प्रकल्पाचे शुक्रवारी उद्घाटन करताना आयुक्त पी. शिवशंकर. शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आदींसह मान्यवर.**

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविकात प्रकल्पाबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, सुमारे ५००० लिटर प्रतितास इतकी उच्च शुद्धीकरण क्षमता असलेला हा प्रकल्प विद्यापीठाने स्वनिधीतून उभारला आहे. या जलशुद्धीकरण यंत्रणेबरोबरच सेमी-ऑटोमॅटिक प्रकारातील बॉटलिंग प्लँटही उभारण्यात आलेला आहे. या प्रकल्पाद्वारे विद्यापीठातील प्रत्येक घटकाला शुद्ध पाण्याची हमी मिळणार आहे. यावेळी या प्रकल्पाचे ऑपरेटर वैभव कुलकर्णी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपकुलसचिव डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी आभार मानले. प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्रभारी परीक्षा नियंत्रक जी. आर. पळसे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 JAN 2017

तरुण भारत

# ऑक्सफर्ड विद्यापीठात कुलगुरू डॉ. शिंदे करणार मार्गदर्शन



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना इंग्लंडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठामध्ये संशोधनावर मार्गदर्शन व विविध विषयावर व्याख्यान देण्यासाठी निमंत्रीत करण्यात आले आहे. सोमवार १६ रोजी कुलगुरू डॉ. शिंदे इंग्लंडला रवाना होणार आहेत.

भारत सरकार व युरोपियन युनियन यांच्या करारानुसार स्थापित 'नमस्ते इंडिया' (नेटवर्किग ॲन्ड मोबिलीटी ॲक्शन्स फॉर सस्टेनेबल टेक्नॉलॉजी इन इंडीया) या प्रकल्पाअंतर्गत ऑक्सफर्ड विद्यापीठाने कुलगुरू डॉ. शिंदे यांचे वैद्यकीय रसायनशास्त्रातील भरीव संशोधन कार्य लक्षात घेऊन त्यांना व्हिजीटींग स्कॉलर म्हणून आमंत्रित केले आहे. एक महिन्याच्या कालावधीत डॉ. शिंदे अध्ययन, अध्यापन, संशोधन, चर्चासत्रे व व्याख्याने देणार आहेत. प्रतिजैविक, निर्मितीविषयक संशोधन कार्यात सहभागी होऊन ते मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2017
लोकमत

# देवानंद शिंदे यांना ऑक्सफर्ड विद्यापिठाचे निमंत्रण



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांना इंग्लंड येथील प्रतिष्ठित ऑक्सफर्ड विद्यापीठात संशोधन व व्याख्यानांसाठी निमंत्रित करण्यात आले आहे. त्यासाठी कुलगुरु डॉ. शिंदे उद्या, सोमवारी इंग्लंडला रवाना होत आहेत.

भारत सरकार व युरोपियन युनियन यांच्यातील करारानुसार स्थापित 'नमस्ते इंडिया' या प्रकल्पांतर्गत ऑक्सफर्ड विद्यापीठाने कुलगुरु डॉ. शिंदे यांचे वैद्यकीय रसायनशास्त्रातील भरीव संशोधनकार्य लक्षात घेऊन त्यांना 'व्हिजिटिंग स्कॉलर' म्हणून आमंत्रित केले आहे. एक महिन्याच्या कालावधीत कुलगुरु डॉ. शिंदे तेथे अध्ययन, अध्यापन, संशोधनादी प्रक्रियांमध्ये चर्चासत्रे व व्याख्याने, आदींच्या माध्यमातून सहभागी होतील. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# कुलगुरू डॉ. शिंदे यांना 'ऑक्सफर्ड'चे निमंत्रण

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना इंग्लंड येथील प्रतिष्ठित ऑक्सफर्ड विद्यापीठात संशोधन व व्याख्यानासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. त्यासाठी डॉ. शिंदे सोमवारी (ता.१६) इंग्लंडला रवाना होणार आहेत.

भारत सरकार व युरोपियन युनियन यांच्या करारानुसार स्थापित 'नमस्ते इंडिया' प्रकल्पांतर्गत ऑक्सफर्ड विद्यापीठाने कुलगुरू डॉ. शिंदे यांचे वैद्यकीय रसायनशास्त्रातील भरीव संशोधनकार्य लक्षात घेऊन त्यांना व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून आमंत्रित केले आहे.

एक महिन्याच्या कालावधीत ते तेथे अध्ययन, अध्यापन, संशोधनादी प्रक्रियांमध्ये चर्चासत्रे व व्याख्याने आदींच्या माध्यमातून सहभागी होतील. विशेषत: प्रतिजैविक (अँटिबॅक्टेरिल ड्रग) निर्मितीविषयक संशोधन कार्यात ते सहभागी होऊन मार्गदर्शन करतील. राज्यपाल सी. विद्यासागर राव व शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी डॉ. शिंदे यांचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 JAN 2017

सकाळ

# कुलगुरू शिंदे यांना ऑक्सफर्ड विद्यापीठाचे निमंत्रण


डॉ. शिंदे

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना इंग्लंड येथील प्रतिष्ठित ऑक्सफर्ड विद्यापीठात संशोधन व व्याख्यानांसाठी निमंत्रित केले आहे. त्यासाठी कुलगुरू डॉ. शिंदे सोमवारी (ता. १६) इंग्लंडला रवाना होणार आहेत. भारत सरकार व युरोपियन युनियन यांच्या करारानुसार स्थापित 'नमस्ते इंडिया' (नेटवर्किंग अॅन्ड मोबिलिटी क्शन्स फॉर सस्टेनेबल टेक्नॉलॉजी इन इंडिया) प्रकल्पांतर्गत ऑक्सफर्ड विद्यापीठाने कुलगुरू डॉ. शिंदे यांचे वैद्यकीय रसायनशास्त्रातील भरीव संशोधन कार्य लक्षात घेऊन त्यांना व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून आमंत्रित केले आहे. महिन्याच्या कालावधीत ते तेथे अध्ययन, अध्यापन, संशोधनादी प्रक्रियांमध्ये चर्चासत्रे व व्याख्याने आदींच्या माध्यमातून सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 JAN 2017

पुण्यनगरी

# कुलगुरू डॉ. शिंदे यांना 'ऑक्सफर्ड'चे निमंत्रण



कोल्हापूर / प्रतिनिधी : - शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना इंग्लंड येथील ऑक्सफर्ड विद्यापीठात संशोधन व व्याख्यानांसाठी निमंत्रित करण्यात आले आहे. त्यासाठी कुलगुरू डॉ. शिंदे सोमवार, दि. १६ रोजी इंग्लंडला रवाना होणार आहेत.

भारत सरकार व युरोपियन युनियन यांच्या करारानुसार स्थापित 'नमस्ते इंडिया' प्रकल्पांतर्गत ऑक्सफर्ड विद्यापीठाने कुलगुरू डॉ. शिंदे यांचे वैद्यकीय रसायनशास्त्रातील भरीव संशोधन कार्य लक्षात घेऊन त्यांना व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून आमंत्रित केले आहे.

15 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# शिक्षणप्रणालीत बदल गरजेचा

## डॉ. आदिनारायण कलानिधी यांचे मत; नॅक मूल्यांकनाविषयी चर्चासत्र

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी शैक्षणिक प्रणालीत आमूलाग्र बदल आवश्यक आहेत. शिक्षणतज्ज्ञ तसेच धोरणकर्त्यांनी समयसूचकता राखून शिक्षणक्षेत्राला दिशा देण्याची गरज आहे,' असे मत चेन्नईच्या आण्णा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आदिनाराणयण कलानिधी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ व केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नॅक पुरस्कृत मूल्यांकन व परीक्षणाचा उच्च शैक्षणिक संस्थांवर होणारा परिणाम' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बीसीयूडी डॉ. डी. आर. मोरे होते.

डॉ. कलानिधी म्हणाले, 'शिक्षणक्षेत्रासह विविध उद्योग-व्यवसायांत कार्यरत असणाऱ्यांनी काळानुरुप बदलत्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. अभ्यासक्रम आणि शैक्षणिक प्रणालीमध्ये बदल करण्याचे आव्हान आपल्या यंत्रणेपुढे आहे. आधुनिकतेची कास धरताना आपल्याला प्रथम शिक्षणपद्धती बदलण्याबरोबरच जुन्या अभ्यासक्रमांचे



डॉ. आदिनाराणयण कलानिधी

भोवतालच्या उद्योगांशी सुसंगत असे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. आपल्याकडील बरीचशी महाविद्यालये आणि विद्यापीठे सरकारी अनुदानावर अवलंबून असल्यामुळे मोठ्या संकटात सापडली आहेत. विद्यार्थ्यांना नोकऱ्या उपलब्ध होत नसल्यामुळे महाविद्यालयांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण घटत आहे. भारत सरकार 'नॅक'च्या माध्यमातून देशभरातील विद्यापीठांचे मूल्यांकन करण्याचा प्रयत्न करीत आहे. या माध्यमातून आपणाला विद्यापीठांमध्ये तसेच महाविद्यालयांत उच्च गुणवत्ता प्राप्तीसाठी होत असलेलें प्रयत्न लक्षात येतात. विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण देणाऱ्या उत्तम दर्जाच्या शिक्षकांची मोठी गरज निर्माण झाली आहे.'

बीसीयूडी डॉ. मोरे म्हणाले, 'विद्यापीठे आणि महाविद्यालयांत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या आधारावर विद्यार्थ्यांच्या रोजगाराचे प्रमाण ठरते. त्यामुळे शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी सातत्याने नवतंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. त्यातून शिक्षणाची नवी दालने धुंडाळली पाहिजेत.'

केआयटीचे सचिव साजिद हुदली यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. आर. के. कामत यांनी प्रास्ताविक केले. परिषदेस प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, उपप्राचार्य डॉ. एम. एम. मुजुमदार आदी उपस्थित होते. प्रा. एस. एस. माने यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 JAN 2017

सकाळ

# शिक्षणातून परिवर्तन शक्य : कन्नान

## अर्थशास्त्र विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त व्याख्यान

कोल्हापूर, ता. १४ : "शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचे चक्र गतिमान करणे शक्य असते आणि त्यातूनच जागतिक परिवर्तन घडवून आणता येते," असे प्रतिपादन विजापूर (कर्नाटक) येथील राज्य महिला विद्यापीठाचे इंग्रजी अधिविभागप्रमुख तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. पी. कन्नान यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त 'आधुनिक भारताच्या विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची प्रस्तुतता' या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रास झाले. त्या प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे होते.

डॉ. कन्नान म्हणाले, "डॉ. आंबेडकर सामाजिक परिवर्तनाचे विविध प्रवाह समजून घेण्यासाठी



आयुष्यातील बहुतेक वेळ विद्याभ्यासात घालविला आणि त्यातूनच परिवर्तनासाठी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचे सबलीकरण करणे ही महत्त्वाची गरज लक्षात आली. त्यांनी आपल्या लिखाणातून भारताच्या खऱ्या सामाजिक इतिहासावर प्रकाशझोत टाकला आहे. पूर्वीच्या काळी सर्वांना शिक्षण घेणे शक्य नव्हते अशा विषमतेच्या परिस्थितीत त्यांनी केलेले सामाजिक, आर्थिक न्यायावरील कार्य फार महान आहे. अठरा-अठरा तास अभ्यास करणारे सर्जनशील वाचक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाई."

डॉ. मोरे म्हणाले, "ज्ञानाची ताकद काय असते, हे जगाला त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले. संविधानाच्या माध्यमातून इथल्या प्रत्येक नागरिकाला शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला. त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहण्यासाठी शिक्षण हे एकमेव स्रोत आहे, हे लक्षात घेऊन राज्य व केंद्र सरकार सातत्याने पुढाकार घेऊन प्रयत्न करत आहेत."

या वेळी बल्लारी विद्यापीठाचे बसवराज एस. बत्री, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, डी. एम. भंडारी, डॉ. प्रवीण के. जाधव, डॉ. आर. जी. दांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. व्ही. पी. कट्टी यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक एस. टी. कोंबडे यांनी आभार मानले.

15 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# 'नॅक' विषयावरील राष्ट्रीय परिषदेचा समारोप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ व के.आय.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नॅक पुरस्कृत मूल्यांकन व परीक्षणाचा उच्च शैक्षणिक संस्थांवर होणारा परिणाम' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा शनिवारी समारोप झाला. केआयटी कॉलेजमध्ये झालेल्या या समारोप कार्यक्रमास बेळगाव येथील केएलई अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. चंद्रकांत कोकाटे प्रमुख उपस्थित होते.शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत, माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी दुपारच्या सत्रात मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी, उपप्राचार्य डॉ. एम. एम. मुजूमदार व विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 JAN 2017

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात हिंदी परिषदेचा समारोप

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागाच्या वतीने आयोजित दोन दिवसीय 'प्रवासी हिंदी साहित्य आणि मानवाधिकार' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचा शुक्रवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत समारोप करण्यात आला. कार्यक्रम वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झाला. या परिषदेची संपूर्ण प्रक्रिया ही डिजिटल पद्धतीने राबवण्यात आली. या डिजिटल प्रक्रियेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल कुलगुरू डॉ. शिंदे यांनी हिंदी विभागाचे अभिनंदन केले. यावेळी प्रा. गोपीनाथन, विवेकशंकर आदेश, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विभागप्रमुख प्रा. पद्मा पाटील आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. रवींद्र भोरे यांनी केले, तर डॉ. प्रदीप लाड यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 JAN 2017

पुढारी

# विद्यापीठामध्ये शिक्षक, पालक, विद्यार्थ्यांचा संवाद उत्साहात

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागामध्ये शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यात संवाद कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम पालक आणि शिक्षक यांच्यामधील दुरावा दूर करण्यासाठी तसेच सुसंवाद साधण्यासाठी महत्त्वाचा ठरला. या कार्यक्रमास वीसहून अधिक पालकांनी उपस्थिती लावून शिक्षकांशी संवाद साधला. सिद्धेवाडीच्या सरपंच छाया चव्हाण कार्यक्रमास प्रमुख उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी डॉ. भारती पाटील होत्या. यावेळी भारती पाटील, जे. एस. गजगेश्वर, विलास यादव, शंकर पोवार, शंकर खाडे, कल्पना खेमे, बळवंत पाटील, विशाल दिपंकर, बाळासाहेब पाटील, करणसिंह सरनोबत, रमेश जगदाळे, सौ. छाया चव्हाण, अशोक देवेकर, प्रियंका देवकर, विशाल कुरणे, कल्लाप्पा बाबू आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास डॉ. प्रकाश पवार, डॉ.भगवान माने व डॉ. रवींद्र भणगे यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन सूर्यकांत गायकवाड यांनी केले. आभार प्रा.डॉ. भगवान माने यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन सचिन भोसले यांनी केले.